दि.०१ ऑक्टोंबर, २०१६

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्यावतीने नियमितपणे होणारी मासिक **“गुरुवार सभा”** सप्टेंबर महिन्यात २९ तारखेला आली होती. थोर चिंतक आणि भारतीय जनसंघाचे संस्थापक स्व.पं.दीनदयाळ उपाध्याय यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून **पं.दीनदयाळ उपाध्याय : जीवन व कार्य** हा या गुरुवार सभेचा विषय होता. **भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्राचे मुख्य प्रवक्ते माधव भांडारी** यांनी हा विषय मांडला. पं.दीनदयाळजींचे जीवन, त्यांची बुध्दीमत्ता, राजकीय प्रगल्भता आणि अंतिमतः राष्ट्राचा विकास या पैलूंवर त्यांनी दीनदयाळजींची अनेक उदाहरणे दिली. समाजातील शेवटच्या घटकाचा विकास करण्यासाठी अत्योंदम ही संकल्पना मांडताणाच एकात्म मानव दर्शनासारखे तत्वज्ञान त्यांनी मांडले, हे भांडारी यांनी सर्वांसमोर मांडले. या गुरुवार सभेला सुमारे ५० जण उपस्थित होते.